
# खांदेरी - उंदेरी

सोनल पाटील



📖 ई - पुस्तक : जलदुर्ग - खांदेरी , उंदेरी

लेखन - संपादन : सोनल पाटील,नाशिक

ई – मेल : sonajeu4@gmail.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

छायाचित्रे : आबासाहेब कापसे, सोनल पाटील.

www.esahity.com
esahity@gmail.com
eleventh floor, eternity
eastern express highway
thane, 400604.

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .

एक वर्षापुर्वी पासून नियोजित ठेवलेली मोहिम अखेर पूर्णत्वाला आली.खांदेरी उंदेरी जलदुर्ग मोहीम मांडे सरांच्या मार्गदर्शनाखाली करण्याची इच्छा,इच्छाच राहून गेली.पण भाऊंच्या सानिध्यात सावलीसारखे राहिलेल्या गावडे सरांच्या मार्गदर्शनाखाली हि मोहीम नव्याने उभी राहिली.

मुंबई, पुणे हून बसच नियोजन केले होते.पूर्ण महाराष्ट्रातून या मोहिमेला 180 च्या वर गडवाटकरी आणि दुर्गप्रेमींनी हजेरी लावली.

नाही हो,नाही हो करत आदल्या दिवशी जाण्याची तयारी सुरु झाली. गाडीने जायचं कि बसने,कस जायचं इथून सुरुवात झाली.शेवटच्या क्षणा पर्यंत नियोजन बदलत होत पण जायचं आम्ही नक्की केल होत.शेवटी सगळे नाशिककर कसार्याला भेटले.मी आणि भारती आधीच जाऊन बसलो होतो.अकोल्याहून वखार भाई,ज्ञानेश्वर येणार होते.बाबा,बाळू दादा आणि त्यांची सौ, ज्ञानेश अशे बाकी मंडळी सरळ कसार्याला भेटणार होते.8 च्या लोकलने सगळे मुंबईला निघाले.बाबा सोबत म्हटल्यावर मुंबई कधी आली समजल नाही.रात्रीचा ट्रेनने असा सगळ्या गडवाटकरींसोबत प्रवास करण्याची हि पहिलीच वेळ होती माझी.

गडवाटकरी सोबत म्हटल्यावर कुठल्याच गोष्टीची काळजी नसते.तिकडे मुंबैकर गाड्या भरून आमची वाट बघत होते पण लेकर उपाशी असल्याने बाबाने स्टेशनच्या बाहेरच एका व्हेज हॉटेलकडे तोफा वळवला.सोबत आपल्या आपल्या भाकरी असल्याने ते आपल्याला आमची शिदोरी उघडू देतील कि नाही याची पंचाईत झाली पण आमच्या मॅनेजमेंटने ते बरोबर हॅड्ल केल आणि आम्ही पोटपूजा केली.तोवर बाहेर आबा आणि बाकी काही गडवाटकरी आम्हाला घ्यायला हजर झाले.त्यांच्यासोबत आम्ही बसकडे गेलो आणि तिथून आमची बस अलिबागकडे धावती झाली.एक बस आधीच गेली होती.पुणे आणि बाकी ठिकाणाहून बस अलिबागकडे रवाना झाल्या असाव्यात.

पहाटे आमची बस अलिबागला पोहोचली.बाकी बस तिथे आधीच येऊन पोहोचल्या होत्या.आम्ही थंडीमुळे बसमध्येच झोपून होतो.सकाळी उठलो आणि फ्रेश होण्यासाठी सर्व लेडीज आणि लहान मुलांची सोय केलेल्या ठिकाणी सर्व गेलो.आवरून सर्व समुद्राच्या किनार्यावर थळच्या बाजारपेठेवर नाश्त्याची सोय केलेली होती.नाश्ता करून सगळे बोटकडे निघाले.तिथे सर्वांची ओळख परेड घेऊन ट्रेक बद्दल माहिती आणि सूचना देण्यात आल्या. बोटच्या अंदाजाने ठराविक लोक बोटमध्ये बसून बोट उंदेरीकडे रवाना झाल्या.

# किल्ले उंदेरी



उंदेरीवर बोट लावायला जागा नाहीये.त्यामुळे बोट तिथेच बुरूज-तटबंदी ढासळून पडलेल्या दगडांच्या आधाराला थांबवली. ढासाळलेल्या बुरूजावरुन काळजी पूर्वक चालत आपण किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यापर्यंत पोहोचतो.दरवाज्याची कमान आजही चांगल्या अवस्थेत आहे.तिथपर्यंत जायला असणार्या दगडी पायर्याही चांगल्या आहे.आपल्या नेहमीच्या किल्ल्यांवरच्या दरवाज्याप्रमाणे यावर कुठल्याही प्रकारचे कोरीव काम किंवा शिल्प नाहीये.हे प्रवेशद्वार रचीव पद्धतीचे असुन चिर्यांमध्ये दर्जा भरलेली नसल्याने ते पूर्णपणे दगाडावर अवलंबून आहे.प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजुलाच एक मोठे जुने झाड आपल्याला दिसते.




मागच्या बोटमधील बाकी गडवाटकरी येइपर्यंत आधीचे मेंबर झाडाखाली बसले होते.सर्वजन आल्यावर गावडे सरांनी किल्याची माहिती दिली.किल्ल्यावरचे अवशेष, किल्ला फिरताना घ्यावयाची काळजी सरांनी सर्वांना दिली.त्यानंतर सर्वांनी किल्ला बघायला सुरुवात केली.

प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला पाण्याचे तिन टाके आपल्या नजरेस पडतात.त्यातील पाहिले दोन टाके हे लहान आहे.तीसरे टाके हे दोघापेक्षा मोठे असून त्यात आत जायला कमान व पायर्या आहे.या तिनही टाक्यातील पाणी पिण्यायोग्य नाहीये. त्यामुळे आपले पिण्याचे पाणी आपल्या सोबत असू द्यायचे.त्यापुढे राजवाड्याचे भग्न अवशेष आपल्याला पहायला भेटतात.तुळशीवृंदावन,समाधी,दरवाजा-भिंतींचे अवशेष आपल्याला दिसतात.किल्ल्याच्या तटबंदीवरुन पुढे चालत गेल्यावर आपल्याला समुद्राच्या दिशेने तोंड करून बसलेली एक तोफ दिसेल.थोड पुढे गेल्यावर बुरूजावर देखील 2 तोफा दिसतात.तिथून उजव्या बाजूला तटबंदीवर तीन तोफा आहे.तिथेच खाली बुरुजामध्ये एक चोर दरवाजा फरसबंदी मार्गे आपल्याला दिसतो.किल्ल्याच्या पश्चिमेकडील बुरूजात अजुन एक दरवाजा आहे.किल्ल्याच्या पश्चिमेकडील मोठ्या प्रमाणात तटबंदी ही ढासाळलेली दिसते, ज्यमुळे भरती-ओहोटीच्या वेळी समुद्राचे पाणी किल्ल्यात येते.किल्ल्याच्या चारी बाजूला चार-चार म्हणजे एकूण बारा बुरुज आहे.बुरुजांच्या मध्यभागी खोलगट जागा आहे.किल्ल्यावर एकूण 15-16 तोफा असतील.किल्ल्याच्या मधला भाग हा मोकळा आहे. पूर्ण किल्ला बघून आमच्या बोट खांदेरीकडे वळाल्या. उंदेरीवर पिण्याच्या पाण्याची सोय नाही.जेवणाची व्यवस्था आपली आपण करायची.किल्ल्यावर राहण्याची सोय नाही.



उंदेरी किल्ल्याच्या प्रवेश द्वाराची भिंत



उंदेरी वरील तोफा

उंदेरी वरील तोफा





उंदेरी वरून दिसणारा समुद्र



उंदेरीवरील भग्न अवशेष

# किल्ले खांदेरी



खांदेरीकडे जाताना समुद्रात असलेला उंच बुरूज आपली नजर रोखून घेतो.कधी-कधी डॉल्फिन आणि सीगलहि आपल्याला दर्शन देतात.खांदेरीचे बुलंद बुरूज आणि मजबूत तटबंदी सोबतच 'मुंबई पोर्ट ट्रस्ट'चे दीपगृह दुरूनच आपले लक्ष वेधून घेतात. खांदेरीवर दक्षिणेला 30 मी तर उत्तरेला 20 मी उंचीची टेकडी आहे.दोन टेकड्यांच्या मध्ये बोट बांधायला धक्का बनवला आहे.तिथेच एक तोफ पुरवलेली दिसते,जिचा मागचा भाग हा पाण्यातून बाहेर डोकावताना दिसतो.तेथून वर चढत गेल्यावर समोरच आपल्याला बोटीचे शेड दिसते.



शेडपासून समोरच वरती दिपगृहाकडे जाणारा मार्ग दिसतो.तिकडे चालत असताना उजव्या बाजूला हनुमानाच छोट मंदिर आहे.आणि पायर्यांनी चालत असताना डाव्या बाजूला भांड्याच्या आवाजाचा दगड आपल्याला झुडपामध्ये दिसतो.पायर्यांनी वरती चालत असताना दीपगृहाच्या बाहेर गेटवर दोन बाजूनी दोन छोट्या तोफा आपल्याला दिसतील.आत मोठे झाडं असल्याने सर्वजण झाडाखाली बसून आपला सुखा खाऊ काढून एकमेकांना देत घेत पोटपूजा करत बसलो.

त्यानंतर गावडे सरांनी दोन्ही किल्ल्यांची सखोल माहिती दिली.आभार प्रदर्शन छोट्या गडवाटकरी सरगम जाधवराव हिने केला.त्यानंतर सर्वजण दिपृहाकडे वळले. या दिपगृहाला ‘कान्होजी आंग्रे दीप’ असे नाव दिले आहे.1867 मध्ये बांधलेल्या या दिपगृहाची उंची 25 मी असून ते षटकोनी आकाराचे आहे.ते सागरी सुरक्षा दलाच्या अंतर्गत असल्याने आत जाण्यास मनाई आहे पण परवानगी घेऊन आपण आत जाऊ शकतो.आत गोल गोल वळणाच्या पायर्यांनी आपण वरती जातो.मध्यावर दोन्ही बाजूने गच्ची आहे.मनोर्यावरून समुद्राचा आसपासचा परिसर आपण पूर्ण पाहू शकतो.दीपगृहाच्या खाली उजव्या बाजूने पायर्यांनी चालत गेल्यावर मागच्या बाजूला एक मोठी टाकी आहे जी चारही बाजूनी बंद केलेली दिसते.टाकीला वळसा घालून आपण किल्ल्याच्या तटबंदीवर येतो.उजव्या बाजूने पुढे गेल्यावर आपल्याला विहिर व उद्वस्त अवशेष दिसतात.तिथेच तटबंदीवर हेलीपॅड आहे.आणि त्याखालीच एक दरवाजा आहे जो आपल्याला किल्ल्याच्या बाहेरील बाजूने समुद्राच्या कडेला घेऊन जातो.तेथून बाहेर पडल्यावर आपल्याला किल्ल्याची मजबूत तटबंदी आणि बुरूज बघायला भेटतात.



तटबंदीच्या खालच्या बाजूलाच मोठ्या प्रमाणात मोकळे चिरे पडलेले दिसतात.ज्यामुळे सागराच्या लाटांचा वेग कमी होतो आणि त्या लाटा मुख्य तटबंदी पर्यंत येत नाही.त्या चिर्यावर सागराच्या लाटांचा मोठ्या प्रमाणात मारा होत असल्याने त्यावर मोठ्या प्रमाणात कोरल वाढलेले आहे.तिथून तटबंदीने डाव्या बाजूला पायर्यांनी वरती चालत गेल्यावर आपल्याला गाडा असणारी तोफ दिसते.

ही तोफ अजूनही चांगल्या स्थितीत आहे.तोफेचा आकार मध्यम आहे.अश्याच दोन तोफा लहान टेकडीच्या बाजूला असणाऱ्या बुरूजावर आहे.त्या तटबंदीपासून पुढे सरळ चालत गेल्यावर दोन्ही बाजूने मोठे मोठे दगड पडलेले दिसतात. मधेच तटबंदी पडलेली आढळते. पुढे एका ठिकाणी मोठं-मोठी खूप जुनी झाड एकमेकांना विळखा घालून उंच वाढत असलेली दिसतात.पुढे बुरूजावर काही ठिकाणी समुद्राकडे तोंड करून तोफ दिसते तर काही ठिकाणी गवतात दडलेल्या अवस्थेत.तिथून चढ चढून पुढे झाडांमध्ये असलेल्या भांड्याचा आवाज करणाऱ्या दगडाजवळ येऊन पोहोचतो.पहिल्यांदा ऐकणार्याला या गोष्टीवर विश्वासच बसणार नाही की एखाद्या दगडामधून भांड्याला मारल्याचा आवाज येतोय.आमचंही सुरुवातीला तेच झालं.म्हणून प्रत्यक्षात अनुभवच घेऊन बघितला.मग काय एका बाजूने बाबा आणि एका बाजूने दादा आणि मधेच भारती असे तिघंही दगड बडवून एक वेगळाच आनंद घेऊ लागले.निसर्ग काय किमया करेल हे आपण विचारही करू शकत नाही.असो

तिथून खाली गेल्यावर आपण परत बोटांच्या शेड जवळ येऊन पोहोचतो.किल्ल्यावर महादेवाचे जुने मंदिर असून गणपती आणि मारुतीचे नंतरच बांधलेले मंदिर आहे.शेडच्या उजव्या बाजूला वरती वेताळाचे मंदिर दिसते.आत एक पांढऱ्या रंगाने रंगवलेली भली मोठी शिळा आहे.ही शिळा म्हणजेच वेताळ.ही शिळा दरवर्षी आकाराने मोठी होत जाते अशी स्थानिकांची श्रद्धा आहे.होळीच्या दिवशी इथे जत्रा भरते.सगळे कोळी लोक याला हजेरी लावतात.हे कोळी लोक वेताळाचे दर्शन घेतल्याशिवाय माशेमारीला



वेताळ शिळा

समुद्रात उतरत नाही.त्या मंदिरात एका बाजूला समुद्री माश्यांचे दात ठेवलेले आपल्याला दिसतात. आणि वेतळासमोर नारळ.जे आमच्या बाबांना फोडून खायला खूप आवडतात.मग काय मारला ताव.



खांदेरी वरील शार्क माश्याचे दात

आम्ही दर्शन घेऊन येईपर्यंत काही मेंबर पुढे गेले होते.शेवटी आम्ही जेवढे उरलो होतो तेवढे सगळे आणि अजून दुसरे काही लोक आमच्या सोबत आमच्या बोटमध्ये बसून थळ कडे रवाना झालो...तसा उशीर होत आला होता.दुपारपर्यंत शांत वाटणारा समुद्र आता त्याच अक्राळ-विक्राळ रूप दाखवण्याच्या मूड मध्ये दिसत होता.बोट मध्ये नेहमीपेक्षा थोड जास्त वजन झालं होतं.वाऱ्यामुळे उचंच उंच जाणाऱ्या लाटांकडे बघून मनात भीतीदायक आनंद होत होता .समुद्राच्या लहरींबरोबर आमची बोट उंच झोके घेत थळच्या दिशेने जात होती...

थळ वरून सर्व गाड्या अलिबाग मधील कान्होजी आंग्रे यांच्या मूर्ती आणि समाधीला वंदन करून आपल्या आपल्या दिशेने धावल्या...



अलिबाग गावात असलेली कान्होजी आंग्रे यांची भव्य प्रतिमा

# खांदेरी-उंदेरी चा इतिहास

अलिबाग पासून 10 किमी अंतरावर थळ गाव आहे.गावात पूर्ण कोळ्यांची वस्ती आहे.थळच्या किनार्यावर नैसर्गिक उंचवट्यावर खुबलढा किल्ला आहे.म्हणजेच थळचा किल्ला.थळच्या किल्ल्यावरून खांदेरी-उंदेरी बेटावर पूर्ण लक्ष देता येत होते.खांदेरी किल्ल्याच्या वेळी आणि नंतरही या किल्ल्याने इतिहासात महत्वाची भूमिका बजावली आहे.थळच्या किनार्यावर आजही या किल्ल्याचे अवशेष बघायला भेटतात.ऐतिहासिक नोंदीनुसार या किल्ल्याला 100 फुट लांब तर 90 फुट रुंद तटबंदी असून 4 बुरुज होते.पण आताच्या परिस्थितीला या किल्ल्याच्या पायाचे आणि काही ठिकाणी बुरुजाचे अवशेष आपल्याला थळच्या किनार्यावर बघायला भेटतात.

खांदेरी-उंदेरी ही बेटे मुंबई आणि मुरुडचा जंजिरा यांच्या मध्ये असल्यामुळे इंग्रज आणि सिद्धी यांच्यावर वचक बसविण्यासाठी महाराजांनी इ.स.1672 ला किल्ला बांधायचे ठरविले होते आणि किल्ल्याची तटबंदी बांधायला सुरुवात देखील केली होती पण महाराजांनी किल्ला बांधला तर ते आपल्यासाठी धोक्याचे असेल हे इंग्रज आणि सिद्धीने हेरले आणि इंग्रजांनी खांदेरीवर आपला हक्क सांगून किल्ला बांधायला विरोध केला.पोर्तुगीजांकडून इंग्रजांना मुंबई मिळाली होती,त्या बरोबरच खांदेरी-उंदेरी म्हणजेच हेनरी आणि केनरी हि बेटेही मिळाल्याचा त्यांनी दावा केला आणि किल्ल्याला वेढा घालण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे महाराजांनी तात्पुरते बांधकाम थांबवून माघार घेतली.त्यानंतर इ.स.1679 साली

महाराजांनी मिया नाईक(मायनाक) या भांडारीला किल्ल्याचे बांधकाम करण्याची जोखीम जबाबदारी दिली,जी मायनाक भंडारी यांनी आपल्या कडव्या साथीदारांसोबत जबाबदारीने स्वीकारली.मायनाक भंडारी हे स्वराज्याच्या आरमाराचे अधिकारी होते.150 सहकारी आणि 4 तोफा यासहीत मायनाक खांदेरीवर हजर झाले.ऐन जुलैमध्ये पावसाळ्यात खांदेरीचे बांधकाम सुरू झाले.इंग्रजांनी कॅप्टन विलियम मिन्चीन,रिचर्ड केग्वीन,जॉन ब्रान्डबरी ,फ्रान्सिस थोर्प असे नामांकित सागरी सेनापती खांदेरीवर पाठवून ते बेट आपल्या ताब्यात घेण्याचे मोठे प्रयत्न केले.रिव्हेंज आणि हंटर नावाच्या दोन फ्रिगेटी त्यांनी पाठवल्या होत्या.गेप आडनावाच्या माणसाकडून काही गुरबा(जहाजांचे प्रकार) भाड्याने घेऊन त्यावर काही तोफा कशातरी बांधून त्यांनी इंग्रजी आरमार पाठवण्याचा प्रयत्न केला.पण मायनाक भांडारीनी त्यांना न जुमानता बांधकाम चालू ठेवले.किल्याचे बांधकाम करणारे कामकरी इंग्रजांचा हल्ला परतवून लावण्यासाठी प्रसंगी धारकरी होत.

मायनाक भंडारी यांच्या मदतीला नंतर थळच्या किनार्यावरून दौलतखानचा आरमारी ताफा आला. दौलतखानच्या आरमारीने इंग्रजांच्या आरमारच्या त्रुटी पटकन ओळखल्या.मायनाक साठीदारा सोबत किल्ल्यावर काम करत होते तर दौलतखान किल्ल्यासाठी लागणारी रसद थळच्या खुबलढा किल्ल्यावरून पुरवायचे काम करत होता.हि रसद किनार्यावरून किल्ल्यावर पोहोचू नये यासाठी त्यांना प्रतिबद्ध म्हणून किनारा आणि बेट यामध्ये नाविक मोर्चेबंदी उभारण्याचे इंग्रजांनी ठरविले होते.पण त्यांचे मोठे जहाज किनारा ते बेट या उथळ भागात जास्त वेळ तग धरू शकत नव्हते.वार्यामुळे त्यांचे जहाज किनार्याकिडे लोटले जाऊन किनार्यालिगतच्या दगडांवर आपटले जात होते.त्यामुळे त्यांना आपली जहाज खोल पाण्यात न्यावी लागत होती.त्यांच्या डव्ह नावाच्या छोट्या गुराबेवर पाठीमागून तोफ नसल्याने मराठा

आरमाराने त्यांच्या त्या त्रुटीचा चांगलाच फायदा घेतला.पाठीमागून चक्राकार हल्ला चढवून ती गुराब पकडली.त्यावरील इंग्रजांना सागरी कैदेत ठेवले.

या कमी मराठा आरमाराच्या उथळ तळाच्या छोट्या होड्यांनी महत्वाची कामगिरी निभावली.ओहोटीच्या वेळी उथळ पाण्यातून या होड्या वल्हावत नेणे सहज सोपे होते.मराठ्यांना सागराची भारती-ओहोटी,खोल-उथळ पाणी,मतलय वारे या सारखे स्थानिक ज्ञान इंग्रजांपेक्षा जास्त होते.त्यात मराठ्यांच्या संगमेश्वरी नावाच्या वेगळ्या आराखड्याच्या होड्यांनी युद्धात चांगली कामगिरी केली.मराठे रातोरात या चिंचोळ्या होड्या वल्हावत किनार्या वरून बेटावर सामान पोहोचते करीत आणि इंग्रजांना चकमा देत.सिद्दीने उंदेरी वरून खांदेरीवर तोफांच्या हल्ल्याचा अयशस्वी प्रयत्न केला.
ब्रिटिशांच्या एका पथकाने लेफ्टनंट थॉर्प यांच्या नेतृत्वाखाली खांदेरी बेटावर हल्ला चढविला तो हल्ला फसला थॉर्प, ब्रॅडबरी आणि हेन्री वेल्च हे मारले गेले. बरेच लोक जखमी झाले. जॉर्ज कोल आणि इतर अनेकांना कैद करण्यात येऊन खांदेरी किल्ल्यावर ठेवण्यात आले.

हा वृत्तांत कळविताना रिव्हेंज या जहाजाचा कप्तान मीचींन याने पाठवलेले पत्र -

यावेळी जर मराठे चालू आले तर मी स्वतःचे संरक्षण करू शकेन अशी माझी परिस्थिती नाही. आपण लवकरात लवकर नवीन सैनिक तरी पाठवावेत किंवा पुढे काय करावे यासंबंधी आदेश तरी पाठवावेत, अशी विनंती आहे. कारण मराठ्यांच्या पुढे आमचा निभाव लागणार नाही.

मुंबईच्या इंग्रजांना मीचींन याने पाठवलेले पत्र पत्राची तारीख आहे 19 सप्टेंबर 1679.
मराठ्यांकडून शरणागतीचा, तहाचा, सामारोपाचा काही संकेत येतो काय, याकडे डोळे लावून बसलेल्या इंग्रजांना एके दिवशी उजाडता उजाडता दिसले की खांदेरीवर मोठे पांढरे निशाण लावले आह. पांढरे निशाण म्हणजे शरणागती. इंग्रजांना अति आनंद झाला. आता मराठ्यांकडून कोणीतरी शरण पत्र घेऊन येणार. तरी नंतर तह कसा करायचा, किल्ल्याचा ताबा कसा घ्यायचा असे विचार करत ते वाट पाहत बसले. मराठ्यांच्या कडून कोणीच पुढे येईना. सिद्दीला पण आनंद झाला होता. घाई घाईने सिद्दीने दोन चार माणसांना एका होडीतून मराठ्यांशी बोलणी करायला व वस्तुस्थिती पहायला पुढे पाठवले. होडी खांदेरीला आली. सिद्दीचा विचार समजताच मराठ्यांनी त्यांना धक्काबुक्की करून घालवले. इंग्रजांची माणसं खांदेरीला गेली. शरणागतीचा शब्दही मराठ्यांच्या तोंडून निघाला नाही. इंग्रजांनी विचारले की या पांढर्या बावट्याचा अर्थ काय ? मराठे हसायला लागले व म्हणाले की, किनार्याविरील आमच्या माणसांना विशिष्ट संकेत दर्शक हा पांढरा बावटा लावला आहे बेट ताब्यात द्यायचा आमचा विचार नाही. इंग्रज खजील होऊन परत गेले.मराठ्यांनी इंग्रजांची पुरती फजिती केली. ती तारीख होती 21 नोव्हेंबर 1679.शेवटी नाईलाजाने इंग्रजांनी इ.स.1680 मध्ये शिवाजी महाराजांशी तह केला.

पुढे 1701 मध्ये सिद्धी याकूत खान याने खांदेरीवर हल्ला केला पण मराठ्यांनी तो परतवून लावला.1718 मध्ये इंग्रजांनी मोठा तोफखाना युद्ध नौकावर ठेवून किल्ल्यावर हल्ला केला पण किल्लेदार माणकोजी सूर्यवंशी याने किल्ला 500 माणसांनिशी महिनाभर लढवला.त्यामुळे इंग्रजांना माघारी फिरावे लागले.पुढे 1814 मध्ये खांदेरी पेशव्यांच्या ताब्यात गेला.1817 मध्ये त्याचा ताबा परत आंग्रेकडे आला.

अलिबाग हे गाव मुंबई-पणजी हायवेला जोडलेले असल्यामुळे तुम्ही स्वताच्या गाडीनेही येऊ शकतात.

बसने तुम्ही अलिबागपासून 10 किमी अंतरावर असणार्या थळ गावापर्यंत जाऊ शकतात.थळच्या बाजार पेठेवरून खांदेई-उंदेरीकडे जायला बोटी उपलब्ध असतात. किल्ल्यावर जाताना भरपूर पाणी सोबत असुद्या.जाताना भारती-ओहोटीच्या वेळा बघून जा.

**संदर्भ-मराठा आरमार**

**छत्रपती शिवाजी महाराज- वा सी बेंद्रे**

**माहिती संकलन-सोनल पाटील,नाशिक**



esahity@gmail.com

http://www.esahity.com